# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०५/२०२४ (शनिवार) दुपार**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ३०,२५०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १७/०५/२०२४ चे **१९.३० वा. ते २०.०० वा.** दरम्यान मा. उपविभागीय पोलीस अधीकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड सा. हे स्टाफसह पोस्टे मौदा परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, कामठी ते गुमथळा रोडवर गुमथळा शिवारात टिप्परद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने कामठी ते गुमथळा रोडवर गुमथळा शिवारात नाकाबंदी करून रेती वाहतुक करणारे टिप्पर क्र. एम.एच ४०/बी.एफ—५९३३ चा चालक **आरोपी नामे— संजय गनपत चाचेरे, वय ४० वर्ष, रा. अढयाळ ता. पौनी जि. भंडारा** यानी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने व वाहन **मालक नामे— राजु आकरे रा. मारोडी** याचे सांगण्यावरुन बिना रॉयल्टी रेती वाहतुक करीत असल्याचे मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन टिप्पर क्र. एम. एच ४०/बी.एफ—५९३३ किंमती ३०,००,०००/— रुपये व ०५ ब्रास अवैध रेती किंमती २५,०००/— रुपये असा एकुण ३०,२५०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— **पोशि धनराज चौरपगार** उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कन्हान विभाग कन्हान यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे **आरोपी चालक नामे—१) संजय गनपत चाचेरे, वय ४० वर्ष, रा. अढयाळ ता. पौनी जि. भंडारा २) मालक नामे— राजु आकरे रा. मारोडी** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३, ४ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली **मा.** उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. संतोष गायकवाड सा. व पोशि धनराज चोरपगार, चालक राजेंद्र मारबते यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर